महाराष्ट्र शासन

क्रमांक : संकिर्ण-२०१७/प्र. क्र.५६५/आस्था.-१
मराठी भाषा विभाग,
८ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
दुरध्वनी क्र. ०२२-२२८५१२२२
दिनांक : ०५ जून, २०१७.

## निविदा सूचना

मराठी भाषा विभाग (खुद्द), महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांना मासिक दरावर वाहनचालकांच्या सेवेची आवश्यकता आहे. त्यानुसार मासिक दरावर वाहनचालक पुरविण्याबाबत निविदा धारकारकांकडून दिनांक ०१/०७/२०१७ ते दिनांक ३०/०६/२०१८ या कालावधी करीता निविदा मागविण्यात येत आहेत. निविदेच्या अटी व शर्ती पुढील प्रमाणे आहेत :-

१. वाहनचालक भारतीय नागरीक असावा तसेच त्यास मराठी लिहिता/ वाचता/बोलता येणे आवश्यक राहील.
२. वाहनचालकाचे निवासाचे ठिकाण मुंबई शहरातील असावे.
३. वाहनचालकाचे वय १८ वर्षे पूर्ण असावे व ५८ वर्षापेक्षा जास्त नसावे.
४. वाहनचालकासोबत त्याचा वाहन चालविण्याचा परवाना तसेच त्याचे ओळखपत्र (आधारकार्ड/निवडणूक ओळखपत्र/पॅन कार्ड यापैकी एक) त्याच्याकडे असावे.
५. संस्थेतर्फे पुरविण्यात येणारा वाहनचालक गुन्हेगारी पार्श्वभूमीचा / प्रवृत्तीचा नसावा.
६. वाहनास अपघात झाल्यास व दुदैवाने वाहन चालकास गंभीर स्वरुपात इजा झाल्यास वाहनचालकास वैद्यकीय खर्च अथवा नुकसान भरपाईचे कोणतेही दायित्व शासनावर असणार नाही.
७. वाहनचालकाचा दिवसाचा कामकाजाचा कालावधी ९ तास राहील. त्यानुसार वाहनचालकाच्या वेतनाचा मासिक ठोक दर नमूद करावा.
८. वाहनचालकाच्या सेवा ९ तासांपेक्षा जास्त झाल्यास शासनाच्या प्रचलित दराने अतिकालिक भत्ता वाहनचालकास देय होईल.
९. मुंबई/बृहनमुंबई (मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या हद्दीच्या) बाहेर जावे लागल्यास वाहनचालकाच्या भत्त्याचा दर नमूद करावा. तसेच रात्रौ १०.००

वाजल्यानंतर थांबल्यास जेवण भत्ता व रात्रौ ११.०० वाजल्यानंतर थांबल्यास घरी जाण्यास प्रवास भत्त्याचा दर नमूद करावा.

१०. वाहन चालकांची सेवा पुरविण्याबाबत रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर शासनाशी एक वर्षासाठी करार करणे आवश्यक राहील.

११. ज्यावेळी संस्थेचा वाहन चालक रजा घेईल त्यावेळी त्याच्याऐवजी बदली वाहन चालक पुरविण्याची जबाबदारी संस्थेची राहील. तसेच ज्यावेळी अतिरिक्त वाहनचालकाची मागणी करण्यात येईल तेवढया कालावधीसाठी वाहनचालक पुरविणे देखील बंधनकारक राहील.

वरील अटी व शर्ती विचारात घेऊन मासिक दरावर वाहनचालक पुरविण्याबाबत दरपत्रक निविदा सोबतच्या विहित नमुन्यात दिनांक १४/०६/२०१७ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत मोहोरबंद लिफाफ्यात अवर सचिव (आस्थापना), मराठी भाषा विभाग, ८ वा मजला, नविन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांचे नावे व या पत्त्यावर पाठवाव्यात किंवा प्रत्यक्ष आणून द्याव्यात.

प्राप्त दरपत्रक निविदा उघडण्याची तारीख, वेळ व ठिकाण आपण नमूद केलेल्या ई-मेल पत्त्यावर कळविण्यात येईल. सदर माहितीचे अवलोकन करण्याची जबाबदारी निविदाकाराची राहील. दरपत्रक निविदांचे मोहोरबंद लिफाफे उघडतेवेळी निविदाधारक स्वत: किंवा त्यांचा एकच प्रतिनिधी उपस्थित राहू शकेल.

अवर सचिव, महाराष्ट्र शासन
(मराठी भाषा विभाग)

दिनांक : ०५ जून, २०१७.
ठिकाण : मुंबई

मराठी भाषा विभाग
८ वा मजला, नविन प्रशासन भवन,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दूरध्वनी : ०२२-२२८५१२२२

## मासिक दराने वाहनचालक पुरवठा करण्याबाबत निविदा

१. निविदाधारकाचे नाव व पूर्ण पत्ता :

२. पत्रव्यहराचा पत्ता :
३. दूरध्वनी क्रमांक अ) कार्यालय :
ब) मोबाईल
४. E mail Address :

सुचना : दरपत्रक कागदपत्रात कोठेही खाडाखोड, ओव्हररायटींग (गिरविणे), पांढरी शाई लावणे टाळावे. चुकून तसे करावे लागल्यास पूर्ण स्वाक्षरी करावी, तसे न केल्यास निविदा रद्द करण्याचे अधिकार शासनाने राखून ठेवले आहेत.

| बाब | दर रुपये |
|---|---|
| १) वाहनचालकाच्या वेतनाचा मासिक ठोक दर नमुद करावा. वाहनचालकाचा दिवसाचा कामकाजाचा कालावधी ९ तास राहील. | |
| २) ९ तासापेक्षा जास्त झाल्यास शासनाच्या प्रचलित दराने अतिकालिक भत्ता वाहनचालकास देय होईल. (रु. ४०/-) | |
| ३) मुंबई/बृहनमुंबई (मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या हद्दीच्या) बाहेर जावे लागल्यास वाहनचालकाच्या भत्याचा दर नमूद करावा. | |
| ४) वाहनचालकास रात्रौ १०.०० वाजल्यानंतर थांबल्यास घरी जाण्यास प्रवास भत्त्याचा दर नमूद करावा. | |
| ५) वाहनचालकास रात्रौ ११.०० वाजल्यानंतर थांबल्यास घरी जाण्यास प्रवास भत्त्याचा दर नमूद करावा. | |

दिनांक :
ठिराण :

स्वाक्षरी व शिक्का